माझं जरा चुकलंच!



प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ
विज्ञान साहित्यिक

## डॉ. जयंत नारळीकर

1966 सालची गोष्ट! त्या वर्षी माझ्या जीवनात महत्त्वाचे स्थित्यंतर घडून आले. माझा विवाह झाला आणि मी ब्रह्मचर्याश्रमातून गृहस्थाश्रमात प्रवेश केला. माझी पत्नी, पूर्वाश्रमीची मंगला राजवाडे ही गणिताची एक हुशार विद्यार्थिनी, मुंबई विद्यापीठाच्या चांसेलर सुवर्णपदकाची विजोती. आमचे लग्न ठरले तेव्हा ती टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्च येथे गणितात संशोधन करीत होती. टी. आय. एफ. आर. मधील गणित विभागात डॉक्टरेट साठी संशोधन करु पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना अवघड चाचण्यांतून पार व्हावे लागत होते. त्यातून ती पार झाली होती आणि तीन-चार वर्षांत तिला पीएच. डी. नक्कीच मिळाली असती.

परंतु त्या काळी मी केंब्रिज विद्यापीठात काम करत होतो आणि तिथे आणखी 5-6 वर्षे तरी राहणार होतो. अशा स्थितीत माझ्यापुढे दोन पर्याय होते. एक म्हणजे पत्नीला टी. आय. एफ. आर. मध्येच राहू देणे आणि दुसरा तिला राजीनामा द्यायला सांगून माझ्याबरोबर केंब्रिजला आणणे.

त्याकाळची मानसिकता वेगळी होती. पतीच्या करियरला प्राथमिकता देऊन पत्नीने आपली करियर सांभाळावी अशा भावनेने मी साहजिकपणे दुसरा पर्याय पसंत केला आणि तिनेही वाद न घालता त्याला संमती दिली.

आम्ही केंब्रिजला आल्यावरही तिने गणिताशी संबंध ठेवला. त्यावेळी तिच्यापुढे काही पर्याय आले. एक म्हणजे तिथे पीएच. डी. करण्याचा. त्याच सुमारास आणखी वेगळा पर्याय समोर आला, तो म्हणजे तेथील एका कॉलेजात टीचिंग फेलोशिपचा. केंब्रिजला भेट देण्याकरता आलेले अमेरिकन प्राध्यापक ईल्स यांनी तिच्या योग्यतेबद्दल मोठी शिफारस करायची तयारी दर्शविली होती आणि त्यामुळे तिला ती फेलोशिप मिळालीही असती. परंतु दोन्ही प्रसंगी मी अनास्था दर्शविल्यामुळे तिने केंब्रिजमध्ये प्रासंगिक लेक्चर कोर्स आणि ट्रायपॉसच्या विद्यार्थ्यांना ट्यूटोरियल सुपरव्हिजन देण्यापलिकडे अनौपचारिक रुपातच गणिताशी संबंध ठेवला.

आजच्या स्त्री-पुरुष समानतेच्या काळात- अद्याप ती समानता आली नसली तरी तशी असावी ही मानसिकता येऊ घातली आहे अशा काळात- मला ही जाणीव होते की माझ्याकडून हा एक अन्याय झाला. गणिताची मनापासून आवड असलेल्या व्यक्ती मुळातच कमी असतात. आणि ज्या तशा असतात त्यांच्या कर्तृत्वाला पूर्ण वाव दिला पाहिजे. स्त्री-पुरुष हा भेद केला जाऊ नये. हे पटत असूनही माझ्या पत्नीबाबत मी घेतलेले निर्णय- निदान केंब्रिजमध्ये तिच्या पुढे असलेल्या संधींचा फायदा तिला न देणे- हे चुकीचे होते.

आम्ही 1972 मध्ये भारतात स्थायिक झालो. क. ध. संयोगाने मला टी. आय. एफ. आर. मध्येच प्राध्यापकाची जागा मिळाली. आमच्या मुली लहान होत्या. त्या शाळेत जाऊ लागल्या तेव्हा माझ्या पत्नीने परत संशोधनाचा मार्ग पत्करण्याची तयारी दर्शविली. आणि 1982 मध्ये तिला टी. आय. एफ. आर. मधील प्रख्यात प्राध्यापक रामचंद्रा यांच्या मार्गदर्शनाखाली अंकगणितात डॉक्टरेट मिळाली. ह्यावेळी मात्र माझे तिला पूर्ण सहकार्य आणि प्रोत्साहन होते. पण आमच्याबरोबर राहणारे माझे आईवडील, गृहस्थाश्रम आणि लहान मुली ह्या सर्वांची यथायोग्य काळजी घेऊन पीएच. डी. चा किल्ला सर करणे किती अवघड आहे याची कल्पना आम्हा मर्दांना येणार नाही.

ह्या अनुभवातून बोध घेऊन माझ्या तीनही मुलींच्या उच्चशिक्षणाच्या बाबतीत मात्र मी स्त्री-पुरुष समानतेचा दृष्टिकोन अंमलात आणला आहे. सौ. मंगलाची अर्थातच त्याला साथ आहे.

* * *